प्रेस नोट                    दिनांक १३/११/२०२४

**मोटार सायकल चोरी करुन मोबाईल खेचणा-या सऱ्हाईत गुन्हेगारांच्या टोळीस अटक केलेबाबत**

दि. २९/१०/२०२४ रोजी रात्रौ २२.१० वा.च्या दरम्यान फिर्यादी कुमारी एमी एला कौलर,वय ३६ वर्षे, व्यवसाय- अभिनेत्री या १४ वा रस्ता, ब्ल्यु टोकाई कॉफी स्टोअर, खार पश्चिम या ठिकाणाहुन ते त्यांचे मित्रा सोबत जात असताना त्यांच्या उजव्या हातातील काळया रंगाची पर्स ज्यामध्ये ॲपल कंपनीचा आयफोन १५ प्रो व इतर साहित्य हे एका अनोळखी मोटार सायकल स्वाराने हिसकावुन चोरुन घेवुन गेला म्हणुन खार पोलीस ठाणेस अनोळखी मोटार सायकल स्वाराचे विरोधात गु.र.क्र १०६२/ २०२४ कलम ३०४ भा.न्या.स अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा आजपावेतो केलेल्या तपास व तांत्रिक विश्लेषणावरून सदरचा गुन्हा हा आरोपी क्रमांक १ नामे सिध्दार्थ रुपेश पाटील, वय २६ वर्षे व आरोपी क्रमांक ०२ नामे सादीक झाकीर शेख, वय २० वर्षे यांनी केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून, नमुद अटक आरोपीकडून नमुद गुन्यातील जबरीने चोरी केलेला आय फोन १५ प्रो अं.कीं ८०,०००/- रुपये हा हस्तगत करण्यात आलेला आहे. नमूद आरोपी हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून ते मोटार सायकल चोरी करुन त्याचा वापर गुन्हे करण्याकरीता करतात. नमुद अटक आरोपींकडे अधिक तपास केला असता त्यांनी खार पोलीस ठाणे व बांद्रा पोलीस ठाणे परिसरात आणखी ०४ गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झालेले आहे. तसेच नमुद अटक आरोपीतांविरुध्द इतर पोलीस ठाणे गुन्हे नोंद आहेत. नमुद अटक आरोपींकडुन खालील प्रमाणे गुन्हयातील मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

**आरोपींकडून हस्तगत करण्यात आलेला मूद्देमाल**

खार पोलीस ठाणे गु.र.क्र १०६२/२४ कलम ३०४ भा.न्या.स यामधील आयफोन १५ प्रो अं.कि. ८००००/- रुपये.

खार पोलीस ठाणे गु.र.क्र १०६७/२४ कलम ३०४ भा.न्या.स यामधील सॅमसंग नोट ४ मोबाईल फोन अं. की ७०,०००/- रुपये.

खार पोलीस ठाणे गु.र.क्र १०४९/२४ कलम ३०३(२) भा.न्या.स यामधील हॉन्डा कंपनीची पांढ-या रंगाची डिओ अं.की. ३०,०००/-रुपये

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा.विषेश पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. परमजितसिंग दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ श्री. दिक्षीत गेडाम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, वांद्रे विभाग श्री. अधिकराव पोळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संजीव धुमाळ, खार पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. वैभव काटकर, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उप.नि/श्री. कुंभारे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार श्री. भरत काच्चे, श्री. दिनेश शिर्के, श्री. आनंद निकम, श्री. योगेश तोरणे, श्री. महेश लहामगे, श्री. अजित जाधव, श्री. मयूर जाधव, श्री. अभिजीत कदम, श्री. मनोज हांडगे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

-------oo--------